| Headlines: NSE Emerge: IPOs of 7 SMEs to open on a single day | |
|---|---|
| **Source:** Maharashtra Times | **Date:** 29 September 2016 |

# एकाच दिवशी ७ आयपीओ

## ‘एनएसई’च्या ‘इमर्ज’ मंचावर लघू, मध्यम उद्योगांमध्ये गुंतवणुकीची संधी

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

राष्ट्रीय शेअर बाजारात (एनएसई) लघू व मध्यम उद्योगांसाठी (एसएमई) सुरू असलेल्या इमर्ज या मंचावर येत्या शनिवारी (१ ऑक्टोबर) एकाच दिवशी सात कंपन्या प्राथमिक भागविक्रीला (आयपीओ) सुरुवात करणार आहेत. या सर्व कंपन्या आयपीओच्या माध्यमातून ४० कोटी रुपयांची भांडवल उभारणी होणार आहे. ‘एनएसई’मध्ये एकाच दिवशी एवढे आयपीओ प्रथमच येत असून, गुंतवणूकदारांना गुंतवणुकीची मोठी संधी मिळणार आहे.

सात आयपीओंपैकी पाच आयपीओंचे व्यवस्थापन हेम सिक्युरिटीज लिमिटेड करणार आहे. या आयपीओंची मर्चंट बँकर असलेल्या या कंपनीचे संचालक गौरव जैन यांनी ‘महाराष्ट्र टाइम्स’ला सांगितले, की पुढील काळात एसएमई कंपन्यांना चांगले भवितव्य आहे. ते म्हणाले, की ‘नॅसडॅक हा जगप्रसिद्ध निर्देशांकदेखील सुरुवातीला एसएमई निर्देशांक म्हणूनच तयार झाला होता. जगभरात एसएमई कंपन्यांनीच अधिक संख्येने आयपीओ आणले आहेत. गुंतवणूकदारांचा विश्वास एसएमई कंपन्यांच्या आयपीओमध्ये वाढतो आहे’. चालू वर्ष हे प्राथमिक बाजारासाठी आश्वासक वर्ष असून आतापर्यंत ६४ कंपन्यांचे आयपीओ आले आहेत. त्यापैकी आयपीओंची संख्या ४५ वर गेली आहे.

राष्ट्रीय शेअर बाजारात एकाच दिवशी दाखल होणाऱ्या एसएमई आयपीओंमध्ये धनुका रिएॅल्टी, पानसरी डेव्हलपर्स व आर्ट निर्माण हे तीन आयपीओ बांधकाम क्षेत्रातील आहेत. स्पिरिट व मद्यार्क निर्मिती क्षेत्रातील औरंगाबाद डिस्टिलरीचा आयपीओही यामध्ये आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय मालवाहतूक क्षेत्रातील ग्लोब इंटरनॅशनल कॅरिअर्स तर ग्रेटेक्स व साकार या अनुक्रमे औद्योगिक उत्पादन व औषधनिर्मिती क्षेत्रातील एसएमई कंपन्या भांडवल उभारणी करणार आहेत.

**३० सप्टेंबर रोजी येणारे सात आयपीओ**

| कंपनी | पर्यंत खुला | भागसंख्या | प्रतिभाग किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| ग्रेटेक्स इंडस्ट्रीज | ५ ऑक्टोबर | २०,२८,००० | १९ ते २१ |
| साकार हेल्थकेअर | ५ ऑक्टोबर | २९,६१,००० | ४२ ते ५० |
| धनुका रिएॅल्टी | ६ ऑक्टोबर | १०,५६,००० | ४० |
| पानसरी डेव्हलपर्स | ६ ऑक्टोबर | ४६,३२,००० | २२ |
| औरंगाबाद डिस्टिलरी | ६ ऑक्टोबर | २२,००,००० | ३५ |
| ग्लोब इंटरनॅशनल | ६ ऑक्टोबर | २१,५४,००० | २४ |
| आर्ट निर्माण लि. | ७ ऑक्टोबर | २०,०४,००० | २५ |

(स्रोत: एनएसई)

> **एसएमईसाठी राष्ट्रीय शेअर बाजाराचा इमर्ज मंच उपयुक्त ठरत आहे. एसएमई कंपन्यांना भांडवल उभारणीची संधी मिळत आहे.**
>
> - **रवी वाराणसी,** इक्विटी, इक्विटी डेरिव्हेटिव्ह व एसएमई समूह प्रमुख




**सप्टेंबर महिन्यात एनएसई इमर्जवर येणारे व आलेले आयपीओ**

| कंपनी | भांडवल उभारणी लक्ष्य |
|---|---|
| ह्युसिस कन्सल्टन्सी लि. | ४१.९५ |
| क्राउन लिफ्टर्स लि. | ६६.७९ |
| जेट निटवेअर्स लि. | ४.२२ |
| एव्हीएसएल इंडस्ट्रीज लि. | ५.१८ |
| नंदानी क्रिएशन लि. | ४०.४३ |
| ग्रेटेक्स इंडस्ट्रीज लि. | २१.०० |
| साकार हेल्थकेअर लि. | १२.४३ |
| औरंगाबाद डिस्टिलरी लि. | ७.७० |
| आर्ट निर्माण लि. | ५.०१ |
| ग्लोब इंटरनॅशनल कॅरिअर्स लि. | ५.१७ |
| पानसरी डेव्हलपर्स लि. | १०.१९ |
| धनुका रिएॅल्टी लि. | ४.२२ |